Subject Code **J-239**

Seat No.

M

DATE : 20/06/2026

Time : 11.00 - 2.00

SUBJECT : SECRETARIAL PRACTICE (52)

DURATION : 3 Hours | TOTAL PAGES : 4 | TOTAL MARKS : 80

सूचना :
(i) सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.
(ii) उजवीकडील अंक प्रश्नांचे पूर्ण गुण दर्शवितात.
(iii) डावीकडील अंक प्रश्नांचे क्रमांक दर्शवितात.
(iv) प्रत्येक प्रश्नाच्या उत्तराचा प्रारंभ नवीन पानावर करावा.

प्र. १. (अ) खाली दिलेल्या पर्यायांमधून योग्य पर्याय निवडून वाक्य पुन्हा लिहा : (५) २०

(i) कंपनीला सरकारकडे -------- भरावा लागतो.
(अ) कर (ब) लाभांश
(क) व्याज

(ii) अमेरिकन ठेव पावतीची विक्री -------- मध्ये होते.
(अ) लंडन (ब) जपान
(क) यु.एस.ए.

(iii) कायद्यातील तरतुदीनुसारच्या कृतीमुळे भाग ------- होते.
(अ) जप्ती (ब) वारस नोंद / संक्रमण
(क) वाटप

(iv) कर्जरोख्यांच्या परतफेडीसाठी ---------- खात्यातून निधी वापरला जातो.
(अ) भांडवल (ब) कर्जरोखे परतफेड राखीव निधी
(क) नफा किंवा तोटा

(v) ठेवी हे कंपनीचे --------- प्रकारचे कर्ज आहे.
(अ) स्थिर (ब) दीर्घ मुदत
(क) अल्प मुदत

(ब) खालील प्रत्येक विधानासाठी एक शब्द किंवा शब्दसमूह किंवा संज्ञा लिहा : (५)

(i) भागपेढीचा मध्यस्थ / प्रतिनिधी.

(ii) कंपनीकडून धनकोंना दिला जाणारा परतावा.

(iii) लाभांश वाटपाचे साधन.

(iv) संघटित पद्धतीने भागांच्या खरेदी विक्रीचे व्यवहार होणारी जागा.

(v) अल्प मुदतीसाठी निधी पुरवतो असा बाजार.

(क) जोड्या जुळवा : (५)

गट 'अ'	**गट 'ब'**
(अ) खेळते भांडवल	(१) जास्तीत जास्त ३६ महिने
(ब) संचालक मंडळ	(२) वित्तीय प्रतिभूतींचा व्यापार
(क) ठेवींचा कालावधी	(३) भौतिक पद्धतीतील समस्या
(ड) वित्तीय बाजार	(४) एकूण चालू मालमत्ता
(इ) अनियमित / बनावट हस्तांतरण	(५) कर्जरोखे विक्रीचा अधिकार
	(६) जास्तीत जास्त ३० महिने
	(७) एकूण चालू दायित्व
	(८) वस्तूंचा व्यापार
	(९) एन.सी.एल.टी.
	(१०) इलेक्ट्रॉनिक पद्धतीतील समस्या

(ड) गटात न बसणारा शब्द शोधा : (५)

(i) जमीन व इमारत, यंत्रसामग्री, रोख रक्कम

(ii) दर्शनी मूल्य, परतफेडीचे मूल्य, बाजार मूल्य

(iii) सेबी (SEBI), कर्जरोखेधारक, भागधारक

(iv) लाभांश खाते, लाभांश आदेश, न दिलेला / मागणी न केलेला लाभांश खाते

(v) नवीन विक्री बाजार, दुय्यम बाजार, कॉल मनी मार्केट

प्र. २. खालील संज्ञा / संकल्पना स्पष्ट करा (कोणत्याही चार) : ८

(i) वित्त गुंतवणुकीचा निर्णय
(ii) व्यापारी धनको
(iii) प्राथमिक समभाग विक्री (IPO)
(iv) कर्जरोखे प्रमाणपत्र
(v) रिमटेरियलायझेशन
(vi) भाग बाजार

प्र. ३. खालील घटना / परिस्थितीचा अभ्यास करून आपले मत लिहा (कोणत्याही दोन) : ६

(i) अल्फा कंपनीने आपल्या भागधारकांकडून प्रत्येकी ₹ १०० दर्शनी किंमत असलेल्या व धारण केलेल्या प्रत्येकी भागावरील न दिलेली ₹ २०ची मागणी केली आहे. कंपनीने भागधारकांना पैसे कंपनीच्या बँकेत विशिष्ट मुदतीत भरण्याविषयी पत्राद्वारे कळविले आहे.

(अ) भागधारक त्यांनी धारण केलेल्या प्रत्येक भागावर ₹ २० देण्यास जबाबदार आहेत का?

(ब) कंपनीने तिच्या भागधारकांना ज्या पत्राद्वारे प्रतिभाग ₹ २० भरण्यासाठी कळविले आहे त्या पत्रास काय म्हणतात?

(क) भागधारक सदर रक्कम विशिष्ट मुदतीत भरण्यास असमर्थ ठरल्यास त्याचा परिणाम काय होईल?

(ii) श्री. राजेश यांनी स्टार कंपनी लिमिटेडचे १०० भाग डिमॅट पद्धतीमध्ये घेतले आहेत.

(अ) त्यांना प्रत्येकी एक भाग पत्नी, मुलगी आणि मुलाकडे हस्तांतरित करायचा आहे ते असे करू शकतात का?

(ब) त्यांना भाग हस्तांतर करण्यासाठी (DRF) किंवा (DIS) सादर करण्याची आवश्यकता आहे का?

(क) ते त्यांच्या पत्नीला डिमॅट खात्यामध्ये नामनिर्देशित करू शकतात का?

(iii) डोनाल्ड कंपनी लिमिटेडने ₹ १० प्रतिभाग लाभांश आर्थिक वर्ष २०२४–२५साठी जाहीर केला आहे.

(अ) लाभांश जाहीर केल्यापासून ३० दिवसांच्या आत वाटप न केल्यास कंपनीने कर्तव्य करण्यात कसूर केली असे होईल का?

(ब) कंपनीने न दिलेला लाभांश कर्जरोखे राखीव निधी खात्यास वर्ग करणे योग्य आहे का?

(क) कंपनीने ३० दिवसानंतर न दिलेला लाभांश आयइपीएफला वर्ग करावा का?

प्र. ४. फरक स्पष्ट करा (कोणतेही तीन) : **१२**

(i) मालकीचे भांडवल आणि कर्जाऊ भांडवल

(ii) हक्क भाग आणि बोनस भाग

(iii) अंतरिम लाभांश आणि अंतिम लाभांश

(iv) अडत्या आणि दलाल

प्र. ५. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा (कोणतेही दोन) : **८**

(i) कर्जरोखे विक्री करण्यासाठी कंपनी कायदा, २०१३ मधील कोणत्याही चार तरतुदी लिहा.

(ii) व्याजाची वैशिष्ट्ये विशद करा.

(iii) वित्तीय बाजाराची कोणतीही चार कार्ये विशद करा.

प्र. ६. खालील विधाने सकारण स्पष्ट करा (कोणतेही दोन) : **८**

(i) स्थिर भांडवलाच्या आवश्यकतेवर विविध घटक परिणाम करतात.

(ii) कर्जरोख्यांची विक्री करताना कंपनीला कर्जरोखे विश्वस्तांची नेमणूक करवी लागते.

(iii) सर्व कंपन्या आम जनतेकडून ठेवी स्वीकारू शकत नाहीत.

(iv) इलेक्ट्रॉनिक प्रतिभूती या भौतिक स्वरूपातील प्रतिभूतीपेक्षा अधिक सुरक्षित आहेत.

प्र. ७. खालील प्रश्न सोडवा (कोणतेही दोन) : **१०**

(i) भाग प्रमाणपत्र वाटपास तयार असल्याचे कळविणारे पत्र भागधारकास लिहा.

(ii) कर्जरोख्याचे वाटप केल्याबाबतचे पत्र लिहा.

(iii) ठेवीदारास व्याज अधिपत्राद्वारे ठेवीवरील व्याज दिल्याविषयीचे पत्र लिहा.

प्र. ८. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा (कोणताही एक) : **८**

(i) कर्जरोखे म्हणजे काय? कर्जरोख्यांचे विविध प्रकार स्पष्ट करा.

(ii) भाग वाटपाच्या कायदेशीर / वैधानिक / नियामक तरतुदी स्पष्ट करा.

◆◆◆